दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २७४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.३ जानेवारी २०२३ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# स्पिडी कंपनी जवळ आगीचे तांडव

## दहा कटिंगी आगीच्या भक्ष्यस्थानी

**दै.रायगड नगरी । उरण**

**जेएनपीए बंदराच्या अखत्यारीत असलेल्या स्पिडी या कंपनी जवळील कटिंगला ररात्रीच्या सुमारास आग लागण्याची दुदैवी घटना घडली. सदर आगीवर नियंत्रण आणण्यास जेएनपीए बंदरातील अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले आहे. सदर आग कशामुळे लागली याचे कारण समजले नाही. मात्र या आगीत प्रकल्पग्रस्तांचे उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या दहा कटिंगी भक्ष्यस्थानी पडल्याचे भयानक चित्र समोर येत आहे.**



२०२३ या नवीन वर्षाच्या पहिल्याच रात्री जेएनपीए बंदराच्या अखत्यारीत येत असलेल्या स्पिडी या मालाची हाताळणी करणाऱ्या कंटेनर यार्ड ( कंपनी) जवळील कटिंग ला रविवारी (दि१) रात्रीच्या सुमारास आग लागण्याची दुदैवी घटना घडली आहे. या आगीची तीव्रता एवढ्या मोठ्या प्रमाणात होती की कटिंग मधिल सिलिंडरचा मोठा स्फोट झाला. यावेळी निद्रिस्त अवस्थेत असलेले व्यावसायिक, नागरीक, कामगार सैरभैर पळत सुटले. सदर आगीची माहिती स्पिडी कंपनीच्या सुरक्षा रक्षकांनी पोलीस यंत्रणा व जेएनपीए बंदरातील अग्निशमन दलाच्या जवानांना दिली.

सदर आगीच्या ज्वाळा आकाशात उंच झेप घेऊ लागल्याने घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जेएनपीए बंदरातील तीन बंम गाड्यातील अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण आणण्यास शर्थीचे प्रयत्न केले. सदर आगीत कुठल्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही.

मात्र सदर आगीवर नियंत्रण आणण्यास अग्निशमन दलाच्या जवानांना दोन तास लागले. या आगीच्या भक्ष्यस्थानी प्रकल्पग्रस्तांच्या दहा कटिंगी पडल्या असल्याने प्रकल्पग्रस्तांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. न्हावा शेवा पोलीस ठाण्याकडून सदर घटनेचे गांभीर्य ओळखून पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे.मात्र सदर आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

जेएनपीए बंदर प्रशासनाने जेएनपीए प्रकल्पग्रस्तांच्या उदरनिर्वाहासाठी हाकर्स झोन (कटींगी) दिल्या आहेत. मात्र त्या कटींगी मध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.तरी आम्हा कुटुंबावर आज जे संकट ओढावले आहे. त्या संकटातून बाहेर पडण्यासाठी जेएनपीए बंदर प्रशास–नाने जेएनपीए प्रकल्पग्रस्तांना आर्थिक सहकार्य करावे अशी मागणी लिलाबाई अनंत म्हात्रे, मंजुळा महादेव तांडेल, शंणू अनंता कडू या जेएनपीए प्रकल्प बाधित महिलांनी केली आहे.

# रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची कोंकण विभागीय आयुक्तपदी पदोन्नती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची कोंकण विभागीय आयुक्त पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पदोन्नतीने सदर नियुक्ती करण्यात आली आहे.



रायगडच्या जिल्हाधिकारी पदी ऑगस्ट २०२१ मध्ये नियुक्त झालेल्या डॉ. कल्याणकर यांच्या कडे मागील काही महिन्यांपासून कोकण आयुक्तपदाचा जादा भार सोपविण्यात आला होता. त्यानंतर पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या डॉ. कल्याणकर यांची शासनाने पदोन्नती करण्यात आली आहे. त्यांची जागा अद्याप रीक्त आहे. डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी आपत्कालीन परिस्थितीत खंबीर पणे उभं राहून रायगडकरांचे पालकत्व स्वीकारले होते. जनसामान्यांचे प्रश्न त्यांनी तात्काळ सोडविले होते. तर कोरोना कालावधीत त्यांनी अनेकांना मदतीचा हात दिला होता. २००७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी असणारे डॉ. महेंद्र कल्याणकर कामगार आयुक्त म्हणून कार्यरत होते, त्यानंतर रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून योग्य भूमिका बजावली आहे.

# निसर्गप्रेमींची विकेंडला 'रामबाग' ला पसंती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

निसर्ग सौंदर्याचे केंद्रबिंदू बनलेली रामबाग फुलली असून उलवेनोडसह, नवीन मुंबई पनवेल, उरण तालुनयासह रायगड जिल्ह्यातील नागरीकांनी विकेंडला आपल्या परिवारासह वेळ घालवण्यासाठी रामबागेला पसंती दिली आहे.

दुबईच्या वाळवंटात मिरॅकल गार्डन फुलले त्याचप्रमाणे न्हावे खाडी येथील चिखलमय जमिनीवर भव्य दिव्य आणि महाराष्ट्राच्या सौंदर्यात भर पडणारी रामबाग फुलली आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हि अद्भुत संकल्पना प्रत्यक्षात साकारली आहे. १४ एकर जागेतील या रामबागेत विविध प्रकारची फुलझाडे, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन असे दोन सेल्फी पाँईट, मचवा, पाण्याचे कारंजे, अशा सर्व बाबी निसर्गप्रेमींना आकर्षित करत आहेत. सायकांळी या उद्यानाचे रूप बदलते, त्यावेळी असणारी विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्याचे पारणे फिटणारी असते, त्याचबरोबर वाहन पार्किंग, सुरक्षा अशा विविध पायाभूत सुविधा या ठिकाणी असल्याने हजारो नागरिक भेट देऊन मनमुराद आनंद घेत आहेत. त्यामुळे 'रामबाग' च्या निमित्ताने एक आकर्षण व महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर पडली आहे.



# पनवेलमध्ये उपसरपंच निवडणुकीत भाजप आघाडीवर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यात नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने १० पैकी सहा ठिकाणी झेंडा फडकविला आहे. त्याचप्रमाणे सोमवारी (दि. २) झालेल्या उपसरपंच निवडणुकीतही भाजपने बाजी मारली. पदभार स्वीकारलेल्या शिवकर, नेरे व चिंध्रण येथील सरपंच व नवनिर्वाचित उपसरपंच तसेच सदस्यांना भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शिवकर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी आनंद ढवळे, नेरे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी प्रकाश घाडगे, तर चिंध्रण ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी एकनाथ पाटील हे थेट नागरिकांमधून निवडून आले आहेत.

या सर्व सरपंचांनी सोमवारी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. उपसरपंचपदाच्या निवडणुकीतही भाजपने यश प्राप्त केले आहे. त्यानुसार शिवकर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संतोष मते, नेरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचदी निलिमा निलेश पाटील, तर चिंध्रण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सुजित नामदेव पाटील यांची निवड झाली आहे.

# जैविक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यास हॉस्पिटल, लॅब अपयशी

## सलाईन, इंजेक्शन, सुया उघड्यावर फेकल्या ; प्रदूषण नियंत्रण मंडळाने बजावली नोटीस

**दै.रायगड नगरी । रोहा**

शहरातील मोकळ्या जागेवर सलायन, – इंजेक्शन, सुया, कापसाचे बोळे असा जैविक कचरा फेकला जात असल्याने नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ओला आणि सुका कचरा वेगळा करण्याचे धोरण असले तरी हॉस्पीटल आणि लॅब जैविक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर फेकणाऱ्या डॉक्टरांना पालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटिसा बजावल्या आहेत.

रोह्यात सार्वजनिक घनकचऱ्यामध्ये वैद्यकीय जैविक कचरा टाकला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सलाईनच्या रिकाम्या बाटल्या, वापरलेल्या सुया, इंजेक्शनच्या काचेच्या बाटल्या, कापसाचे भिजलेले गोळे आदींचा यात समावेश आहे. शहरात सुका व ओला कचरा वर्गीकरणासह वेगळा करण्याचे धोरण नगरपालिकेने आखले आहे. असे असताना वैद्यकीय जैविक कचरा थेट सार्वजनिक कचऱ्यात सापडत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास आणि पर्यावरणास धोका निर्माण झाला आहे.

चिपळूण येथील लोटे एमआयडीसीतील 'महाराष्ट्र बायो हायजेनिक मॅनेजमेंट' ही संस्था रोह्यातील जैविक कचरा नेऊन तांत्रिक पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्याचे काम करते. ही संस्था रोज दवाखाने, प्रयोगशाळा आणि रुग्णालयातून हा कचरा उचलून त्याची विल्हेवाट लावते. रोह्यात व्यवसाय करणारे ६० डॉक्टर्स असून १२ प्रयोगशाळा आहेत.

नोंदणीकृत नसलेले डॉक्टर मात्र उघड्यावरच हॉस्पिटल, लॅबमधील कचरा टाकतात. अशा लॅब आणि हॉस्पिटलवर पालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई सुरू केल्याचे मुख्याधिकारी डॉ. धीरज चव्हाण आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी व्ही. व्ही. किल्लेदार यांनी सांगितले.



# पुढील सर्व निवडणुका आघाडीच्या माध्यमातून लढविणार : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

संविधानाने दिलेले अधिकार व राज्यघटनेत नमूद असलेल्या मुद्द्यांना मूठमाती देत मागील काही महिन्यांपूर्वी महाविकास आघाडी सरकार मधून बाहेर पडत काही नेत्यांनी भाजप पक्षासोबत घरोबा करून राज्यात नवीन सरकार स्थापन केले आहे मात्र हे सरकार फार काळ टिकणार नसून राज्यात पुन्हा महाविकास आघाडीचा सरकार येणार असल्याचा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी म्हसळा येथील नवनिर्वाचित ग्रामपंचायत सरपंच व सदस्य सत्कार कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना केले आहे.



यावेळी खासदार सुनिल तटकरे यांनी अधिकपणे बोलताना सांगितले की माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून मागील वर्षाभरात केलेल्या विविध लोकोपयोगी विकास कामांची माहिती देऊन म्हसळा श्रीवर्धन, दिवेआगर या परिसरात पर्यटन वाढीला चालना दिली आहे असे सांगून माजी पालकमंत्री तथा आमदार आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वच लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांच्या सहकार्याने कोरोना महामारी, निसर्ग चक्रीवादळ, महाड येथील पूरपरिस्थिती असे अनेक नैसर्गिक आपत्ती व संकटे यांना धैर्याने सामोरे जाऊन येथील जनतेला विश्वासात्मक दिलासा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेले आहे असे सांगितले.

त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुख्य रस्ते, जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणी योजना मंजूर करणे अशा विविध महत्वाचे कामांना प्राधान्य देऊन गतिमान विकास करण्यावर भर दिला. छत्रपती शिवाजी महाराज, महामानव, महापुरुष, शिक्षणमहर्षी, राज्यातील महिला भगिनी, खासदार सुप्रियाताई सुळे यांचेवर विद्यमान सरकार मधील मंत्री अतिशय खालच्या पातळीवर जाऊन अपशब्द वापरतात याबद्दल खेद व्यक्त करून राज्याचे शिंदे – फडणवीस सरकारचा समाचार घेतला. नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीत तालुक्यातील जनतेने भरभरून मतदान रुपी प्रेम दिले याबद्दल सर्व जनतेचे त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे आभार मानून आगामी काळात होणाऱ्या तालुक्यातील १४ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत देखील भरभरून प्रेम देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता स्थापन करण्याचे आव्हाहन खासदार सुनिल तटकरे यांनी केले.

आयोजित कार्यक्रमात तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत मधील बिनविरोध व प्रत्यक्ष निवडणूकीच्या माध्यमातून निवडून आलेल्या नवनियुक्त सरपंच व सदस्य यांचा सत्कार खासदार सुनिल तटकरे यांचे शुभहस्ते करण्यात आले.

सत्कार कार्यक्रमाला खासदार सुनिल तटकरे यांच्या समावेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अलिशेठ कौचाली,जिल्हा चिटणीस महादेव पाटील, तालुका अध्यक्ष समीर बनकर, नगराध्यक्ष असहल कादिरी, जिप माजी सभापती बबन मनवे, महिला तालुका अध्यक्षा सोनल घोले, जिल्हा महिला चिटणीस रेशमा कानसे, माजी सभापती छाया म्हात्रे, माजी उपसभापती संदीप चाचले, उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे, शाहिद उकये, शहर अध्यक्ष रियाझ घराडे, लहूशेट म्हात्रे, अनिल बसवत, नाना सावंत, सतिश शिगवण, किरण पालांडे, महेश घोले, प्रकाश गाणेकर यांसह नगरसेवक, पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नितळस ग्रामपंचायत सरपंचपदी शिवसेनेच्या सौ.निकिता संदीप पाटील विराजमान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील नितळस ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सौ. निकिता संदीप पाटील या विराजमान होताच महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी फटाक्याची आतिषबाजी करीत एकाच जल्लोष केला.

नितळस ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सौ. निकिता संदीप पाटील तर उपसरपंचपदी महाविकास आघाडीचे रतन भोईर हे विराजमान झाले आहे. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) रायगड उपजिल्हा प्रमुख रामदासदादा पाटील, महानगर प्रमुख एकनाथ म्हात्रे, तालुका प्रमुख विश्वास पेटकर, महानगर संघटक बाळाराम मुंबईकर, विभाग प्रमुख प्रमोद पाटील यांच्यासह महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# एक पाऊल पुढे

विधीमंडळाचे नागपूर येथील हिवाळी अधिवेशन वर्षाच्या शेवटी संपले. २०१९ ला विधानसभेच्या निवडणुकीनंतर हे दुसरे अधिवेशन नागपूर येथे झाले. करोनाच्या कारणामुळे मधली सगळी अधिवेशने मुंबईतच पार पडली होती. जणू काही करोनाचा धोका नागपूरमध्ये अधिक होता! संयुक्त महाराष्ट्रानंतर नागपूरचा पूर्वीचा राजधानीचा दर्जा गेल्याने तेथील जनतेच्या मनात त्याची सल राहू नये, विदर्भातील जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य मिळावे या हेतूने वर्षातून एक अधिवेशन नागपूरात घेण्याच्या करारानुसार हे अधिवेशन होत असते. ते तब्बल दोन वर्षांनी यंदा पार पडले. तेही अवघ्या दहा दिवसांचेच. त्यामुळे या अधिवेशनात विदर्भातील जनतेच्या प्रश्नांना किती वाव मिळाला, ते सोडवण्यासाठी सरकारने कोणत्या घोषणा केल्या यावरच या अधिवेशनाचे फलित ठरायला हवे. सरकार आणि विरोधक हे एकमेकांचे शत्रू असल्याप्रमाणेच वागण्याचा हा काळ आहे. विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये काय चर्चा होतात, यापेक्षा विधीमंडळाच्या आवारात वेगवेगळी वेशभूषा करणे, हेत्वारोप करणाऱ्या घोषणा देणे, राजकीय नेत्यांच्या फुगड्या, भारूड, दिंड्या अशा अनेक गोष्टींनी वाहिन्यांच्या प्रतिनिधींचे लक्ष खेचून घेणाऱ्या गोष्टींमुळे अधिवेशनांच्या गांभीर्यावरच प्रश्नचिन्ह उभे राहण्याची भीती आहे. या अधिवेशनाची सुरुवातदेखील प्रसारमाध्यमांचे लक्ष खेचून घेण्याकरिताच झाली. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले आदी महापुरुषांच्या बदनामीचा मुद्दा विरोधकांनी विधीमंडळात लावून धरला. मात्र, या मुद्द्याला प्रसारमाध्यमांमधून पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळत नव्हता. तितक्यात 'नागपूर सुधार प्रन्यास'मधील (एनआयटी) मुख्यमंत्र्यांशी संबंधित भूखंड व्यवहाराचे प्रकरण विरोधकांच्या हाती लागले. हे प्रकरण कुठून कसे कोणत्या विरोधी पक्षाच्या आमदाराच्या हाती आले, याच्याही अनेक सुरस कहाण्या विधीमंडळाच्या आवारात रंगल्या होत्या. मात्र, या आरोपामुळे मुख्यमंत्री शिंदे घायाळ झाले यात वाद नाही. त्यांनी हा निर्णय बदलला व या प्रकरणातील हवा काढून घेण्याचा प्रयत्न केला. थेट मुख्यमंत्र्यांवर झालेला आरोप हा प्रसारमाध्यमांसाठी चमचमीत विषय होता. त्यामुळे हे प्रकरण किती काळ चालेल याचा अंदाज सत्ताधाऱ्यांना नव्हता. त्यामुळेच दिशा सालियनच्या मृत्यूचे प्रकरण शिंदे यांच्या समर्थक आमदारांनी काढून आदित्य ठाकरे यांनाच लक्ष्य केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची चौकशीही जाहीर करून टाकली. त्यामुळे विरोधक दोन पावले मागे आले तरी अब्दुल सत्तार, संजय राठोड यांच्या गायरान जमीन वाटपाची प्रकरणांद्वारे सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या सगळ्या प्रयत्नांमध्ये राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेस यांचा राजकीय ताळमेळही बऱ्यापैकी दिसत असला तरी विरोधी पक्षनेते अजित पवार हे पाहिजे तितके आक्रमकपणे सत्ताधाऱ्यांविरोधात बोलत नाहीत, अशी कुजबूजही विरोधी गटात सुरू होती. सत्ताधारी व विरोधकांमधील या आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळात विदर्भातील जनतेच्या मूलभूत प्रश्नांना मात्र अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात फारसा वाव मिळाल्याचे दिसले नाही. त्यामुळेच की काय, दुसऱ्या आठवड्यात विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या विदर्भातील विविध प्रश्नांवरून सरकारला अनेक घोषणा कराव्या लागल्या. विदर्भ, मराठवाडा, कोकण, उर्वरित महाराष्ट्रातील विकासाच्या अनुशेषाचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली गेली, वैधानिक विकास महामंडळाला मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवल्याचे सरकारने सांगितले. अधिवेशनात सत्ताधारी कुठल्याही प्रश्नावर अडचणीत आले, की उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एकमेव नेते संसदीय आयुधांचा व आपल्या वक्तृत्वाचा वापर करून सरकारची बाजू सांभाळताना दिसत होते. एका दिवशी तर त्यांच्याकडील सहा खात्यांसह इतरही खात्यांवरील तब्बल सोळा लक्षवेधी सूचनांवर त्यांनी उत्तरे दिली. त्यांच्या तुलनेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे संसदीय कौशल्य फारसे चमकताना दिसले नाही. आपण कसा 'करेक्ट कार्यक्रम' केला, हे मागील अधिवेशनातील पालुपद त्यांनी अजुनही सुरू ठेवल्याबाबत अजित पवार यांनीही त्यांना टोमणा मारलाच. उद्धव ठाकरे मात्र या अधिवेशनात प्रचंड मेहनत घेताना दिसत होते. विरोधी पक्षांमधील समन्वय बैठका, त्यांच्या पक्षाच्या आमदारांशी सातत्याने संपर्क ठेवणे, विधीमंडळातील कामकाजावर बारीक लक्ष ठेवणे हे यापूर्वी कोणत्याही ठाकरेंनी केल्याचे पाहायला मिळाले नव्हते. मुख्यमंत्र्यांवरील 'एनआयटी'च्या आरोपावरून विधानसभा फारशी आक्रमक होत नसल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी प्रयत्नपूर्वक विधान परिषदेत यावर आक्रमक हल्ला चढविण्याची रणनीती यशस्वी करून दाखवली. एकरंदर या अधिवेशनात सत्ताधारी व विरोधक सुरुवातीला प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून घेण्यासाठी सुरुवातीला करीत असलेल्या क्लृप्त्यांच्या पलीकडे गेले आणि काही प्रमाणात का होईना, विदर्भ व महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने त्यांनी पुढे पाऊल टाकले हेच काय ते समाधान!

# तळवली त.अष्टमी सरपंचपदी रविंद्र मरवडे विराजमान ; तर उपसरपंचपदी संदीप महाडिक याची नियुक्ती



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी ग्रा.पंचायतीच्या निवडणुकीत थेट सरपच्च म्हणून निवडून आलेले रविंद्र मरवडे यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला असून संदीप महाडिक यांची उपसरपंचपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

या ग्रा.पंचायतीचे निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस-शेकाप व भाजप आघाडी यांनी ग्रामविकास आघाडीची स्थापना करून या निवडणुकीत थेट सरपंचासह शंभर टक्के यश संपादित केले. तर या निवडणुकीत थेट सरपंच म्हणून निवडून आलेले रविंद्र मरवडे यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला तर उपसरपंचपदी संदीप महाडिक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.या प्रक्रियेमध्ये मनोज जाबोरे यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले.

यावेळी विभागिय जेष्ठ नेते महेंद्र पोटफोडे, बाबुराव बामणे, रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, माजी सरपंच राम मरवडे, वसंत मरवडे, मारूती खांडेकर, राम महाडिक, शांताराम महाडिक, नामदेव मरवडे, गजानन बामणे, सुरेश वाघमारे, नाना शिंदे, रामचंद्र बामणे, एकनाथ मरवडे, शंकर शेलार, पांडुरंग नागावकर, मोरेश्वर मरवडे, रामचंद्र मरवडे, देवजी मरवडे, ठमाजी महाडिक, विनायक महाडिक, प्रमोद शिंदे, प्रमोद लोखंडे, किसन बामणे, विनायक शिंदे, प्रभाकर महाडिक, आदी प्रमुख नेते व कार्यकर्ते नवनिर्वाचित सदस्य हरिश्चंद्र मांगुळकर, दयाराम मरवडे, निलम मरवडे, अनघा खांडेकर, सुकेशिनी महाडिक, तारामती पवार, याच्यासह मोठ्या संख्येने आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सरपंचपदी विराजमान झालेले रविंद्र मरवडे आणि उपसरपंच म्हणून नियुक्ती करण्यात आलेले संदीप महाडिक यांचे उपस्थितीतांनी अभिनंदन व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नगरपंचायत कार्यालयात हुतात्मा वीर भाई कोतवाल पुण्यतिथी साजरी



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

हुतात्मा वीर भाई कोतवाल पुण्यतिथी निमीत्त माणगांव शहरातील नाभिक समाजाच्या तरुण मित्र मंडळाने नगरपंचायत कार्यालयात एकत्र येऊन नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या शुभहस्ते हुतात्मा विर कोतवाल यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पीत, दीपप्रज्वलन करुन त्यांची पुण्यतिथी साजरी केली. आपली संस्कृती, आपले आदर्श, महान व्यक्तीमत्व यांचे दिशादर्शक कार्य त्यांचे विचार, शिकवण, आदर्श यांचे आचरण महत्वाचे असुन अशा प्रकारे पुण्यतिथी साजरी करुन नाभिक समाजाचे तरुण एक चांगले कार्य करीत आहेत.

अलिकडे दुर्दैवाने पाश्चिमात्य संस्कृतीचे स्तोम आहे. थर्टीफर्स्ट, बर्थडेच्या साजरीकरनात आपली संस्कृती, आदर्श आपण विसरत आहोत. अशाप्रकारे समाजातील आदर्शवत व्यक्तींचे स्मरण करुन पुण्यतिथी साजरी करणे ही कौतुकास्पद गोष्ट असल्याचे मनोगत नगराध्यक्षांनी व्यक्त केले. रायगड जिल्हा नाभिक तरुण संघ विश्वस्त भाऊ पांडे, संजय पालांडे गुरुजी, यांनी आपले समयोचित विचार मांडले.

याप्रसंगी नाभिक समाजाचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप जाधव, तालुका अध्यक्ष सौरभ पांडे, माणगांव सलून संघटना अध्यक्ष राजेंद्र जाधव, उपाध्यक्ष राहुल मोरे, कार्याध्यक्ष अभिषेक खंडागळे, समाज बांधव समीर मोहिते, मंगेश बडे, नितीन शिंदे, आशिष जाधव, शैलेश पवार, प्रदीप कदम, सुहास शिंदे, सुरेश हुजरे, दीपेश जाधव, अमोल जाधव, महेश कदम, प्रवीण शिंदे, दीपक मोहिते, सतीश चव्हाण, दिनेश जाधव, महेंद्र जाधव हे समाज बांधव व नगरपंचायत कार्यालयातील कर्मचारीवृंद देखिल उपस्थित होते.

# नगराजशेठ यांचा प्रथम स्मृतिदिन सीबीएसई इंटर नॅशनल स्कूलच्या वतीने साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

निश्चयाचा महामेरू । बहुतजनासी आधारू ।। म्हणून उरणच्या जनतेमध्ये नगराज पुखराज शेठ यांची आगळी-वेगळी ओळख आहे.या निश्चयाचा महामेरूने वयाच्या ७७ व्या वर्षी मावळत्या वर्षा अखेर आपल्या ओंकर अपार्टमेंट,विमला तलावाजवळील निवासस्थानी जगाचा अखेरचा निरोप घेतला आज ३१ डिसेंबर २०२२ रोजी त्यांचा प्रथम स्मृति दिन नगराज शेठ सीबीएसई इंटर नॅशनलस्कूलच्या वतीने साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या प्री-प्रायमरी विभागाच्या मुख्याध्यापिका सौ.ज्योती म्हात्रे मॅम,व प्रायमरी विभागाच्या मुख्याध्यापिका इशिकाजी मॅम यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या हस्ते नगरज शेठ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सुवर्णा शर्मा मॅम व भार्गवी मॅम शिक्षकेतरवर्ग सौ.गुलाब मावशी.सौ.राजश्री मावशी यांच्या सह विद्यार्थी मोठया सख्येने उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी सामुहिक प्रार्थना करून नगराजशेठ यांच्या प्रतिमेस पुष्पवाहून आदरांजली समर्पित केली. यावेळी विद्यार्थ्यांना नगराज शेठ यांच्या कार्याची माहिती देतना ज्योती मॅम म्हणाल्या नगराजशेठ वयाच्या १८ व्या वर्षी राजकारणात सक्रीय सहभाग घेऊन ते सातत्याने ८ वेळा नगरसेवक म्हणून निवडून आल्याचे सांगून त्यांनी सन १९७५ ते १९८० च्या काळात उरण नगरीच्या नगराध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. भविष्यात उरण मध्ये होणाऱ्या औद्योगिक क्रांतीच्या संहिते बरोबरच उरण शहराचा विकासही आवश्यक असल्याची जाण या नेत्यांनी ठेऊन उरण नगरी बरोबरच परिसराचा कायापालट करण्याचा संकल्प करून त्याची अमल बजावणी केली.

मुसद्दी राजकरणा बरोबरच कायद्याचे अफाटज्ञान आणि कुशलप्रशासक म्हणून नगर परिषदेमध्ये असणारे आदरणीय व्यक्तीमत्व म्हणून असणारी त्याची ओळख होती. अनधिकृतपणे, बेकायदेशीरपणे होणाऱ्या गोष्टी बाबत प्रगट होणारा त्यांचा तीव्र संताप, पण तितकाच मनाचा दयाळूपणा, परोपकारी स्वभाव आसल्याने. नगराजशेठ आणि उरणची जनता यांचे अनोखे नाते होते.हेनमूद करीत सामन्य जनतेचे अफाट प्रेम लाभलेल्या या नेत्याची ओळख उरण शहराचे शिल्पकार म्हणून असल्याचे ज्योती म्हात्रे यांनी सांगितले.

शिक्षण हि काळाची गरज ही या दूरदृष्टी असणाऱ्या नेत्याने तेव्हाच जाणून घेतली गोर-गरिबांची मुले शिक्षणा पासून वंचित राहू नये म्हणून उरणनगरपरिषदे मध्ये प्राथमिक शाळेची सोय तर केली. इंग्रजी ही जागतिक मान्यताप्राप्त भाषा आहे मग उरणचा वाढता औद्योगिक विकास लक्षात घेऊन सामान्य माणसालाही आपल्या पाल्याला इंग्रजी शिकता यावे म्हणून उरण एज्युकेशन सोसायटीस्थापनात्यांनी केली. आणि सामान्याच्या मुलां करिता इंग्रजी माध्यमाचा मार्ग खुला केला. मराठी आणि इंग्रजी मध्यमाबरोबरच एक सेन्ट्रल बोर्डचे सीबीएसई स्कूल उरणात सुरुकरण्याचा त्यांचा मांनस होता. त्यापैकी त्यांनी साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्या सहकार्याने उरण-बोरी येथे नगराजशेठ इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल उरणात सुरु केले आहे.

त्यांनी केलेल्या विकास कामाबाबत बरेच काही सांगण्या सारखे आहे.त्याला वेळ अपुरा पडेल अशा थोर पुरुषाचा प्रथम स्मृतिदिन आपण आपल्या विद्यालयाच्या वतीने साजरा करीत आहोत आपण सर्वजण नवीन वर्षाचे स्वगत करताना त्यांना नतमस्तक होऊन भावपूर्ण आदरांजली वाहून त्यांचे स्वप्न साकार करूया हीच त्यांना खरी आदरांजली आणि श्रद्धांजली असेलअसे त्यानी शेवटी सांगितले व सर्वाना नवीनवर्षाच्या हार्दिक शुभेच्छा त्यांनी दिल्या आज त्यांचा प्रथम स्मृतिदिन नगराजशेठ सीबीएसई इंटर नॅशनलस्कूलच्या वतीने व साईसंस्थेच्या वतीने उरणात साजरा करण्यात आला.



# महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेच्या मुख्य क्रीडा ज्योत रॅलीचे किल्ले रायगडवरून आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या वतीने महाराष्ट्र ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचे दि.०५ ते दि.१३ जानेवारी २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. त्यानुषंगाने या स्पर्धेची मुख्य क्रीडा ज्योत रॅली रायगड किल्लयावरुन करण्याचे नियोजन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

या स्पर्धांच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या मुख्य ज्योतीचे प्रज्वलन दि.०४ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ९ वाजता रायगड किल्लयावर करण्यात येणार आहे. ही मुख्य क्रीडा ज्योत निजामपूर-पाटणूस-ताम्हिणी घाट- मुळशी मार्गे श्री शिवछपत्रती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे येथे नेण्यात येणार आहे.

यावेळी महाराष्ट्र ऑलिम्पिक स्पर्धा आयोजन समितीचे पदाधिकारी, जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी तसेच क्रीडा विभागाचे अधिकारी-कर्मचारी, रायगड जिल्ह्यातील सर्व क्रीडा पुरस्कारार्थी, महाराष्ट्र ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सहभागी होणारे रायगड जिल्ह्यातील खेळाडू हे उपस्थित राहणार आहे.

या उद्घाटन कार्यक्रमासाठी रायगड जिल्ह्यातील सर्व क्रीडा पुरस्कारार्थी, रायगड जिल्ह्यातील सर्व एकविध खेळ संघटना, त्यांचे पदाधिकारी, वरिष्ठ खेळाडू, मार्गदर्शक, क्रीडा शिक्षक, शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी, पत्रकार बांधवांनी जरुर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.रविंद्र नाईक यांनी केले आहे.


मा.सोनावणे सा०

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात, पनवेल

चौ.अर्ज क्र.१९३७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०२/२०२३

श्रीमती.पार्वती आनंदा जाधव व इतर — अर्जदार

विरुद्ध

श्री.प्रशांत आनंदा जाधव — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे पती व वडील मयत आनंदा आकाराम जाधव यांचे निधन दि.०८/०५/२०२१ रोजी खारघर, नवी मुंबई येथे झाले. मयताच्या नावे असलेली मिळकत खालील प्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**
**परिशिष्ट ''अ''**
**१) ए/१०/१:६, श्री.महालक्ष्मी को.हौ.सोसायटी घरकूल, सेक्टर-१५, खारघर, नवी मुंबई, रायगड, महाराष्ट्र ४१०२१०**
**एकूण क्षेत्रफळ : ३१.८१ + ४.१६ चौ.मी.**
**एकूण मुल्यांकन रक्कम : ३,२५,८१५/-**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे, असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकरची तक्रार, हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा झालेपासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताच्या मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दि.०२/०१/२०२३

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल १) श्री.रतन तुकाराम खारुटकर २) श्री.बाबुराव तुकाराम खारुटकर रा.दुंदरेपाडा (दुंदराई), ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिंदू एकत्रित कुटुंबांची, वडिलोपार्जित मालकीची, वहिवाटीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाची मिळकत आहे तिचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : चिंचवली तर्फे वाजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक | उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५५ | ३ अ/१ | जिरायत १-३८-०० <br> वर्ग अ ०-०५-८० <br> एकूण १-४३-८० <br> यापैकी ०-६३-०० हे.आर.पॉ. <br> आकार १०.७७ रु.पै. | २३.५९ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

वरील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांच्या हिंदू एकत्रित कुटुंबांची, वडिलोपार्जित मालकीची, कुळवहिवाटीची व ताबेकब्जातील असून आमचे अशिल हे सदरहू हिंदू एकत्रित कुटुंबातील सदस्य असून सख्खे रक्ताचे नातेसंबंध आहे. सदरहू मिळकतीत आमचे अशिलांचा जन्मजात अविभाज्य हिस्सा व हक्क आहे. सदरहू मिळकतीचा कुठल्याही प्रकारचा विकासाचा करार, भाडेकरार, लीज, हस्तांतरण विक्री, दान, बक्षिस, गहाण, फरोक्त खत, खरेदीखताचा कोणताही व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे अशिलांच्या हिश्यांवर बंधनकारक राहणार नाही. त्याचप्रमाणे तुम्ही वरील मिळकती संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास आमचे अशिल तुमच्या विरुद्ध दिवाणी व फौजदारी कारवाई करतील.

दि.०२/०१/२०२३

**सही/-**
**ॲड.सुमित अविनाश म्हात्रे**
**ॲड.दिनेश दत्तात्रेय पाटील**
**मोबाईल नं.८८७९८९७०६९**
**ऑफिस पत्ता : जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४, गावदेवी मंदिरा समोर, राम गणेश गडकरी मार्ग, ता.पनवेल, जि.रायड**



मा.गोडसे मॅडम सा०

वकील मनोज वारंगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९३०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१३/०२/२०२३

दमयंती सुनील कांबळे
रा.फ्लॅट नं.सी-३०१, ३ रा मजला,
वैष्णवदेवी बिल्डींग नं.४, देवद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

अर्जदार यांचे पती मयत कै.सुनील गोपाळ कांबळे रा.फ्लॅट नं.सी ३०१, तिसरा मजला, वैष्णव देवी बिल्डींग नं.४, देवद, ता.पनवेल, जि.रायगड यांचे दि.१२/०३/२०१७ रोजी सिव्हील हॉस्पिटल, ठाणे येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.सी-३०१, ३ रा मजला,**
**बिल्डींग नं.४ वैष्णव देवी म्हणून ओळखली जाते.**
**देवद गाव, ता.पनवेल, जि.रायगड.**
**अंदाजे कारपेट क्षेत्र २२.५ चौ.मी. आणि ८.०० चौ.मी. टेरेस**
**१/२ हिस्सा किंमत रक्कम रुपये ०६,००,०००/-**

वरील मिळकती बाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०२/०१/२०२३ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील पाले बुद्रुक गावामध्ये राहणारी विवाहित महिला पनवेल शहरामध्ये जाऊन येते असे सांगून घराबाहेर पडली मात्र परत घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

काजल तेजस तांडेल (वय २६) असे या महिलेचे नाव असून तिची उंची ५ फूट, रंग-गोरा, केस लांब, डोळे-काळे असून अंगात पिवळ्या रंगाचा - वनपिस ड्रेस तसेच पायात चप्पल घातलेली आहे. सदर महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी क्र.२७४६४३३३ किंवा पोलीस हवालदार मंगेश भूमकर यांच्याशी संपर्क साधावा.

## रमेश पाटील यांची मिस्टर इंडिया स्पर्धेसाठी निवड

**दै.रायगड नगरी । उरण**

शरीर सौष्ठव स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केलेल्या उरण तालुक्यातील दिघोडे गावचे सुपुत्र रमेश पाटील यांनी आतापर्यंत विविध स्पर्धेत अनेक गोल्ड मेडल पटकाविली आहेत त्यांना उत्कृष्ट कामगिरी मूळे महाराष्ट्र श्री गोल्ड मेडल,द्रोणागिरी श्री टायटल चैम्पियन ऑफ चॅम्पियन, वेलर क्लासिक क्रमांक ५ असे अनेक पारितोषिके मिळाली आहेत.

आता त्यांची निवड मिस्टर इंडिया या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून एकमेव अशी निवड झाली आहे. रमेश पाटील हे स्टॉम फिटनेस कोप्रोली येथे व्यायामाचे, फिटनेसचे ट्रेनिंग घेत आहेत. रमेश पाटील यांना आर्यन पाटील,आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डर तथा कोच सिद्धेश शिंदे,निशिकांत घरत, अशीष पाटील,अनिकेत पाटील यांचे नेहमी मार्गदर्शन लाभत असते.रमेश पाटील यांना घडविण्यासाठी तसेच स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय कोच सिद्धेश शिंदे यांनी विशेष मेहनत घेतली आहे.

रमेश पाटील यांची निवड मि.इंडियांच्या शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी झाल्याने जिल्हा परिषद सदस्य कुंदा ठाकूर,माजी जिल्हा परिषद सदस्य वैजनाथ ठाकूर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून तसेच अनेक जणांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून रमेश पाटील यांना शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

# माणगांवकरांची ओम सिद्धी साई दिंडी कोकण श्रीक्षेत्र शिर्डीकडे रवाना

## हजारो माणगांवकरांच्या उपस्थितीत शेकडो साईभक्त निघाले शिर्डी पदयात्रा पालखी सोहळ्यात सहभागी

**दै.रायगड नगरी । माणगाव**

गेली ११ वर्षाची परंपरा असलेली माणगांव ओम सिद्धी साई दिंडी कोकण ही १ जानेवारी २०२३ रोजी माणगाव शहरातील नानोरे ते शिर्डीकडे जाणाऱ्या पदयात्रेचा प्रारंभ सकाळी १० वाजता झाला. या पदयात्रेतील श्री साई पालखी व पदयात्रा सकाळी नानोरे येथील साई मंदिर येथून सुरुवात झाली त्यानंतर नानोरे चे ग्रामदैवत जनी बापूजी मंदिराला प्रदक्षिणा देत व नानोरे गावाला प्रदक्षिणा देत ही पालखी पदयात्रा मुंबई गोवा महामार्गवरून श्री दत्त मंदिर माणगाव -श्री साई मंदिर विकास कॉलनी ते दशरथ गावडे यांचे निवासस्थान व त्यांनतर निजामपूर येथील कामेरकर यांचे निवासस्थान रात्री वस्ती अशी पदयात्रा श्री क्षेत्र शिर्डी कडे रवाना होत आहे.



सुमारे ३०० किमी पायी प्रवास असणाऱ्या पदयात्रेत सुमारे २३० साईभक्त सामील आहेत तर त्यापैकी १६५ साईभक्त पायी प्रवास करणार आहेत. या परंपरागत दिंडी चे नियोजन संस्थापक अशोक वाढवळ यांच्या प्रेरणेने साई चरणरज समाधान उतेकर कार्यकारिणी अध्यक्ष सुभाष उतेकर, उपाध्यक्ष गजानन वाढवळ, चिटणीस महेंद्र पाटोळे, सहचिटणस भारत जाधव, पालखी सोहळा अध्यक्ष संतोष खडतर, उपाध्यक्ष महेश शिर्के, उपखजिनदार परेश म्हात्रे, सल्लागार दीपक थळकर, मिलिंद साखरे, सागर कोळवनकर, रमेश बक्कम यांच्या सह माणगाव तालुक्यातील बहुसंख्य साईभक्तांनी केले आहे.

या पदयात्रेचा प्रवास सुमारे ८ दिवसांचा असून प्रतिदिन ४० किमी अंतर साईभक्त कापणार आहेत.ही साईपालखी निजामपूर नंतर २ जानेवारी रोजी डोंगरवाडी विंझाई देवी मंदिर ताम्हिणी. ३ जानेवारी मुळशी पौड,४ जानेवारी पौड ते देहू, ५ जानेवारी राजगुरू नगर अवसर फाटा मंचर, ६जानेवारी आळेफाटा धारगाव,७ जानेवारी साकुरफाटा ते संगमनेर, ८ जानेवारी कवठे कमळेश्वर ते नांदूरखी, ९ नांदूरखी ते श्री क्षेत्र साईमंदीर शिर्डी असा असणार आहे.

ही श्री साई पालखी पदयात्रा सामाजिक एकोपा टिकावा, समाज सलोखा निर्माण व्हावा, सर्वधर्म सहिष्णुतेची शिक्षण समाजात रुजावी, साईबाबांची महती व चमत्कार जनमानसात रुजावे, हा उद्देश साईदिंडी च्या माध्यमातून आम्ही समाजात रुजवण्याचा आम्ही श्री साई प्रेरणेने प्रयत्न करत असल्याचे मत साईचरण समाधान उतेकर व पालखी सोहळा अध्यक्ष संतोष खडतर यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. कोरोना कालावधी संपल्यानंतर सर्व धार्मिक कार्यक्रमात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यामुळे दरवर्षी पेक्षा या वर्षी ओम सिद्धी साईदिंडी कोकण माणगाव ला हजारो माणगांवकर आणि शेकडो साईभक्त उपस्थित होते माणगाव तालुक्यातील बाजारपेठ, विकासकॉलनी, साईनगर, दत्तनगर, गणेशनगर या विभागातील आबालवृद्धानी पालखीचे दर्शनघेत पुष्पसुमनानी स्वागत केले.

## नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी ५९ उपसकांनी केले रक्तदान

**दै.रायगड नगरी । कर्जत**

श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जतच्या वतीने समर्पण ब्लड बँक कल्याणच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी ५९ उपसकांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत - खालापूर तालुक्यातील ४६५ वे रक्तदान शिबिर होते.

सद्गुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जतच्या वतीने रविवार दि.१ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत कर्जत मधील श्री शनी महाराज मंदिराच्या रविकिरण सभागृहात मध्ये आयोजित करण्यात आले होते. जेष्ठ उपासक अरुण गुरव यांनी ६५ वर्षे पूर्ण झाली तरी मला आज शेवटचे रक्तदान करू द्या. अशी विनंती केली. त्यानंतर डॉक्टरांनी त्यांना तपासले व रक्तदान करण्याची अनुमती दिली. गुरव यांनी रक्तदान केल्यावर त्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे उपासक शिरीष दिघे यांनी पत्नी, मुलगा व कन्या यांच्या सह रक्तदान केले. याप्रसंगी रक्तसंकलानाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तपेढीचे डॉक्टर शेख, लक्ष्मण नाईक, व इतर कर्मचाऱ्यांनी केले. याप्रसंगी एकूण ८० जणांनी रक्तदान करण्यासाठी हजेरी लावली त्यापैकी एकूण ५९ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर २१ जण रक्तदान करण्यासाठी अपात्र ठरले.

याप्रसंगी सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, गणेश सोनी, मीना प्रभावळकर, मुकेश सुर्वे, संदीप पाटील, डॉ. प्रशांत सदावर्ते, गणेश राऊत, जयेश म्हसे, विनोद पांडे, कृष्णा जाधव, संजीव ठाकरे, प्रकाश शहा आदी उपस्थित होते.

## माथेरानमध्ये हुतात्मा भाई कोतवाल यांची पुण्यतिथी साजरी



**दै.रायगड नगरी । माथेरान**

भारत मातेला दास्यमुक्त करण्यासाठी ज्या १०५ राष्ट्रवीरांनी आपले बलिदान दिले त्यापैकीच एक माथेरानचे वीर सुपुत्र हुतात्मा अण्णासाहेब कोतवाल यांची २ जानेवारी रोजी ८० वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. पहाटे साडेपाच वाजता नौरोजी उद्यानापासून हुतात्मा भाई कोतवाल यांच्या घराजवळून मशाल फेरी काढण्यात आली.

सकाळी ०६-०२ मि.नौरोजी उद्यानात हुतात्मा भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याचे समोर नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे) यांच्या शुभहस्ते पुण्यज्योत प्रज्वलित केल्यानंतर त्यांच्या शुभहस्ते भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला नगरपरिषदेचे आस्थापना लिपिक जयवंत वर्तक यांच्या हस्ते पुष्पहार, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्तंभास आवक जावक लिपिक अजय साळुंके यांच्या हस्ते पुष्पहार, वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळा येथे स्वातंत्र्य सैनिक सुभेदार कै. विनय धनावडे यांच्या शिल्पास सारिका धनावडे यांच्या हस्ते पुष्पहार, हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या प्रतिमेस तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या नामफलकास स्वच्छता निरीक्षक नरेंद्र सावंत यांच्या हस्ते पुष्पहार, हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या शिल्पास उमेश मोरे व संदेश कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, प्रेरणा सावंत, अजय सावंत, आकाश चौधरी, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, प्रकाश सुतार, प्रदीप घावरे, राजेश चौधरी, राकेश चौधरी, वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, भास्कर शिंदे, निखिल शिंदे, नगरपरिषदेचे कार्यालय अधीक्षक प्रवीण सुर्वे, अभियंता स्वागत बिरंबले, लेखापाल अंकुश इचके, आरोग्य विभागाचे अभिमन्यू येळवंडे, अन्सार शेख, शिक्षक संघपाल वाठोरे, दिलीप अहिरे, मुख्याध्यापक लक्ष्मण ढेबे, मुख्याध्यापिका कल्पना पाटील, विद्युला गोसावी,सचिन भोईर, दिनेश बागवे, अनिश पाटील यांसह गावातील ठराविक नागरिक ज्यांना वीर हुतात्म्यांच्या बलिदाना बाबतीत संवेदना आहेत त्या मंडळीने उपस्थिती दर्शवली. एकंदरीत या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन प्रशासक सुरेखा भणगे यांनी उत्तम प्रकारे केले.

## ३९० वाहनांवर मोटर वाहन कायद्याच्या इतर कलमान्वये कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वाहतूक शाखेकडून ३१ डिसेंबर २०२२ ते १ जानेवारी २०२३ चे पहाटे ५ वाजेपर्यंत ३९० वाहनांवर मोटर वाहन कायद्याच्या इतर कलमान्वये कारवाई केली आहे. नवीन वर्षाच्या पार्श्वभुमीवर कळंबोली शहर वाहतूक शाखेचे एन विश्वकार यांच्या उपस्थितीत अचानक तपासणी मोहीम राबवित मद्यपान करून वाहन चालविणार्या विरोधात देखील कारवाई करण्यात आली.

रस्ते अपघाताचे प्रमाण कमी व्हावे, अंमली पदार्थांचे (दारुचे) सेवन करुन वाहन चालविणार्यांवर आळा बसावा यासाठी वाहतूक पोलीस कारवाई करत असतात.

नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त नागरिक मोठया प्रमाणात अंमली पदार्थाचे (दारुचे) सेवन करुन वाहन चालवित असतात. त्यात मोठया प्रमाणात अपघात होवून गंभीर दुखापती होवून नागरिकांचे जिवितांचे, मालमत्तेचे नुकसान होते. त्यामुळे याबाबत कारवाईचे आदेश प्राप्त झाले होते.

त्याअनुषंगाने अपघात होवु नये म्हणुन कळंबोली वाहतूक शाखेने ३१ डिसेंबर २०२२ ते १ जानेवारी २०२३ चे पहाटे ५ वाजेपर्यंत शहरात अचानक तपासणी मोहीम राबविली. वाहतुकीस अडथळा करणार्या १८२ वाहनावर कारवाई, विनाहेल्मेट ९२ वाहन चालकावर, विना सिटबेल्ट ७, मद्य प्राशन करून वाहन चालविल्याबद्दल १८ जणांवर कारवाई, धोकादायकरित्या वाहन चालविल्याबद्दल १८ जणांवर कारवाई, रस्त्याचे विरुद्ध दिशेने वाहन चालवल्याप्रकरणी ३ जणांवर कारवाई, सायलेन्सर मॉडीफाय दोघांवर कारवाई, जंपिग सिग्नल ७ जणांवर कारवाई अशा एकूण ३९० वाहनांवर मोटर वाहन कायद्याच्या इतर कलमान्वये कारवाई करण्यात आलेले आहे. यापुढे देखील अशीच कारवाई सुरु राहणार आहे.

## दगडाने ठेचून महिलेची हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील भिंगारगाव भेर्लेवाडी येथील ४५ वर्षीय तारा आनंदा कातकरी या महिलेची अज्ञात इसमाने दगडाच्या साह्याने तिचे हत्या केली. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पोलीस अज्ञात आरोपीचा शोध घेत आहेत.


मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारतर्फे वकील
Adv.Victor K. Fernandes

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१९४१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०२/२०२३

श्रीमती.मजीद मेहमूद शेख
वय : ५० वर्षे, व्यवसाय : व्यवसाय
रा.फ्लॅट नं.१०१, प्लॉट नं.४७,
तळोजा फेस, सेक्टर-२०, तळोजा मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.फहमिदा बेगम मेहमुद शेख, (Faimida Begum Mehmood Shaikh also known as Fahmida Begum Mehmood Shaikh) हे मौजे रुम नं.१०१, प्लॉट नं.४७, सेक्टर-२०, हमदूल तळोजा फेज-२, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८ दि.१९/११/२०२० येथे मयत झाले आहेत. ज्याअर्थी अर्जदार क्रं.१ यांनी कै.फहमिदा बेगम मेहमुद शेख, (Faimida Begum Mehmood Shaikh also known as Fahmida Begum Mehmood Shaikh) यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, ''एच.एम.डी. रिवर व्हु को.हौ. सोसायटी लिमिटेड'', प्लॉट नं.४७, सेक्टर-२०, तळोजा पाचनंद फेज-२, नवी मुंबई-४१०२०८, ता.पनवेल, जि.रायगड. एकूण क्षेत्रफळ ३४.३६२ चौ.मी. आणि ''एच.एम.डी.रिवर व्हु को.हौ. सोसायटी लिमिटेड'' यांचे १० सभासद शेअर्स प्रत्येकी ५० रुपये, डीसटींकटीव नंबर ४१ ते ५०**

वरील अर्जदार क्रं.१ हे मयत कै.फहमिदा बेगम मेहमुद शेख, (Faimida Begum Mehmood Shaikh also known as Fahmida Begum Mehmood Shaikh) यांचे वारसदार आहेत या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करतील याची दखल घ्यावी.

आज दि.०२/०१/२०२३ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.कल्पेश अनंता कांबळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१९०१/२०२२
नि.नं.१०/ड
ने.ता.०४/०२/२०२३

१) श्रीमती.दीपा सुजाराम कुमावत
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.कौशल सुजाराम कुमावत
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
अज्ञान पालनकर्ती आई
श्रीमती.दीपा सुजाराम कुमावत
३) कु.भव्य सुजाराम कुमावत
वय : ११ वर्षे, धंदा : शिक्षण
अज्ञान पालनकर्ती आई
श्रीमती.दीपा सुजाराम कुमावत
रा.रुम नं.३०२, प्लॉट नं.५२१, मधुवन बिल्डींग,
से.२२, तुर्भे, ता.जि.ठाणे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ३ यांचे वडील हे दि.१५/०२/२०२१ रोजी अपोलो हॉस्पिटल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे मयत झालेले आहेत. कै.सुजाराम जेठाराम कुमावत यांच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन-१**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सिअेरा गॅलक्सी, रुम नं.५०५, पाचवा मजला, से.२०, प्लॉट नं.३७ अे | ३४.७५ चौ.मी. कारपेट + ४.०९ चौ.मी. ओपन टेरेस |

कै.सुजाराम जेठाराम कुमावत यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.सुजाराम जेठाराम कुमावत यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२/०१/२०२३ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



### PUBLIC NOTICE

THIS NOTICE is hereby given on behalf of my client M/S.PRATHAMESH INFRA REALITY PVT. LTD through Director Mr.AJIT SHRINATH SINGH, who have filed Special Civil Suit No.193/2014, in Panvel Court against Original Owners/Farmers in respect of property mentioned herein below in the schedule for Specific Performance of Contract and Injunction. Also my client have purchased complete rights, title, benefits, interests in the said below mentioned property from said Original Owners/Farmers, Late Maruti Valku Jitekar through legal Heirs 1) Smt. Anusaya Maruti Jitekar, 2) Shri. Balkrushna Maruti Jitekar, 3) Shri. Kashinath Maruti Jitekar, 4) Smt.Aruna Sanjay Thakur, 5) Smt. Anandibai Maruti Jitekar, 6) Smt. Vaishali Dynaneshwar Bhagat, 7) M/S. Sunny Housing India Pvt. Ltd Through Director Shri. M.C.Sunny and Westwoods through Partners a) Shri.Ramesh Dharamshi Patel, b) Shri. Pratik Girish Chheda, c) Shri. Jignyesh Veerchand Visariya Hence on behalf of my Client, I am giving this Notice to Public at large that not to deal with the above mentioned persons in respect of he aforesaid property. And inspite of this person deal with them or their agents regarding below mentioned properties and faces any loss, then my client will not be responsible for that, they may do so at their own risks, costs and consequences which please note.

**SCHEDULE : CETAILS OF CIVIL SUIT**
**IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D) PANVEL**

Special Civil Suit No.193/2014
Name of Defendant : Anusaya Maruti Jitekar and others

Discription of Property :
Admeasuring about 2299.31 Sq. Mtrs
Cidco File No. 87-DPL
Plot No.189, Sec 20, Ulwe.

Sd/-
**Advocate Deepak Khot**
BSL,LLB. High Court, Mumbai
Add : Off No.32, Plot No.21, Sec 11,
CBD BELAPUR, NAVI MUMBAI,
Mob No. : 9869089217



मे.सोनावणे साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.स्वप्नील एस. ठाकूर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८८७/२०२२
नि.नं.१०/ड
ने.ता.२७/०१/२०२३

श्री.सुनील पहिलाजराय
उर्फ पहिलाज वाधवाणी, वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : उल्हासनगर, जि.ठाणे व मौजे : कशेळी, ता.भिवंडी, जि.ठाणे तसेच मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतींचे वर्णन

१) उल्हासनगर नगरपरिषदेच्या, खाता नं.१६२७/२११५ च्या वॉर्ड नं.४४, नवीन खाता नं.२११५ चा वॉर्ड नं.४४, येथील युनिट नं.९८, शीट नं.१३, शॉप नं.७७ व सपना कॉम्प्लेक्सच्या पाठीमागे, उल्हासनगर-४, जि.ठाणे

२) मौजे : कशेळी, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे नं.१८७, या जागेवरील ''चामुंडा कॉम्प्लेक्स'' मधील आर.सी.सी. गोडावून नं.डी-९, सब प्लॉट नं.डी-९, क्षेत्र ३७२० चौ.फुट (३४५.७२ चौ.मी. बांधीव क्षेत्र व त्या खालील जमीन)

**३) मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अनु. क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ३ (अ) | नेरे | १ | ३ | ३-८४-०० | ३८.४० |
| ३ (ब) | नेरे | १ | ४ | ३-५८-०० | ३५.८० |

कै.पहिलाराजराय उर्फ पहिलाज वाधवाणी, हे दि.०५/०७/२०१६ रोजी ठाणे येथे मयत पावले असून, त्यांना अर्जदार क्र.१) श्री.सुनील पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी, अर्जदार क्र.२) श्री.विनोद पहिलाराय उर्फ पहिलाज वाधवाणी, अर्जदार क्र.३) श्रीमती.राणी पहिलाराय उर्फ पहिलाज वाधवाणी, सबब अर्जदार हेच कै.पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी, यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी कै.पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१७/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# सुधागडातील प्राचिन लेण्यांकडे प्रशासन व पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात प्राचीन व बहुमूल्य लेण्यांचे समूह आढळतात. येथे ठाणाळे, नेणवली, गोमाशी व चांभार लेणी अशा भव्य लेणींचा समूह आहे. देशविदेशातील अभ्यासक व पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. मागील वर्षी येथील लेण्यांमध्ये अमेरिकेतील भन्ते वेन सुका ध्यानधारणेसाठी आल्या होत्या. तर अनेक देशविदेशातील अभ्यासक दौरे देखील करत असतात. जगभरातील पर्यटकांना भावणार्या या लेण्या स्तूप जतन करण्याची गरज निर्माण झालीय.

मात्र या प्राचिन लेण्यांकडे प्रशासन व पुरातत्व विभागाचे फारसे लक्ष नसल्याने त्यांची प्रचंड दुरावस्था झाली आहे. प्राचीन व मौलिक इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तू नामशेष होण्याची भिती त्यामुळे त्यांचे जतन व संगोपन होण्याची अतिशय आवश्यकता आहे. दरम्यान उपद्रवी लोकांकडून रंग रंगोटी, व विद्रुपीकरण करण्यात येत असल्याने लेणी प्रेमी व पर्यटकात नाराजी दिसून येते.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या प्राचीन बौद्ध कालीन लेण्यांची पुरती दुरावस्था झाली आहे. येथिल स्तुप, विहार, चैत्यगृह, शिलालेख स्मारक यांची मोठया प्रमाणात पडझड झाली असुन त्यावर अनेक उपद्रवी लोकांनी चक्क ऑईल पेन्टने नावे लिहीली आहेत. त्यामुळे हि ऐतिहासिक व



इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तु नामषेश होण्याची भिती आहे.

ठाणाळे लेणी समुहात चैत्यगृह, स्मारक,–स्तुपसमुह, सभागृह व उर्वरित २१ विहार लेणी आहे. बहुतांश विहारांमध्ये व्हरांडे आणि एक किंवा दोन खोल्या असून त्यामध्ये शयनासाठी ओटे आहेत. काही विहारांमध्ये समोरच्या भागात दालन व चार पाच भिक्षुंच्या निवासाची व्यवस्था आहे. अशा विहारात आंतरदालन, प्रवेशद्वार, खिडकी व शयन ओटे आहेत. ५ पायर्या असलेल्या एका विहारात वाकाटककालिन रंगीत चित्रांचे काही अवशेष दिसतात. प्राकृत ब्राम्ही लिपीतील शिलालेख असलेले एक पाण्याचे टाके आहे. पाण्याचे हौद, टाके, ब्राम्ही शिलालेख भित्तीचित्र आहेत. या सर्वांची मोठया प्रमाणात पडझड झाली आहे. बरेच अवशेष भग्नावस्थेत आहेत. अनेक उपद्रवी लोकांनी येथील स्तुप, चैत्यगृह, स्मारक यावर चुन्याने व ऑईल पेन्टने आपली नावे कोरली आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तुचे सौंदर्य लुप्त झाले आहे. ठाणाळे लेण्यांसारखा ऐंतिहासिक व पुरातन ठेवा जतन करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष व प्रभावी उपाययोजना राबविण्यात यावी अशी मागणी पर्यटकप्रेमी व लेणीप्रेमी यांनी केली आहे.

ठाणाळे लेण्यांचा काळ हा इ.स. पुर्व दुसर्या शतकापासुन इ.स. ५ व्या शतकापर्यंत आहे. हि लेणी डोंगरामध्ये पश्चिमाभिमुख कोरलेली आहेत. लेण्यात सापडलेल्या विविध वस्तु व मोर्यकालीन चांदीची नाणी पाहाता ही लेणी २२०० वर्षापूर्वीची असल्याचे अनुमान काढण्या येते. लेण्यांचा दगड हा अग्निजन्य (बेसाल्ट) दगड आहे. शिल्पकलेच्या दृष्टीने अप्रतीम असलेल्या तसेच मानवी जिवनाच्या आर्थिक जडणघडणीत या लेण्यांनी महत्वाची भूमिका बजावलेली आहे. हि लेणी समुद्र किनार्यावरुन चौल–धरमतर–नागोठणे खाडीमार्गे देशावर जाणारी व्यापारी केंद्रे होती असे म्हटले जाते. वाघजाई, घाटातून मावळात जाणारा प्राचीन मार्गही या लेण्यांजवळुन जातो. यामुळे ही लेणी चौल बंदराच्या सानिध्याने खोदली गेली आहेत. कोकणातून घाटमार्गे देशावर जात–येतांना विश्रांतीचे स्थान म्हणुन हया लेण्यांचा उपयोग केला गेला. त्याचबरोबर बौद्ध भिक्षूंच्या भदन्त, आचार्य, परित्राजक यांच्या निवार्यासाठी सुद्धा या लेण्यांचा उपयोग इ.स. ५ व्या शतकापर्यंत करण्यात आला आहे.

या लेण्या अतिशय प्राचिन असुन ऐतिहासिक दृष्ट्या खुप महत्वाच्या आहेत. त्यामुळे पुरातत्व खात्याने वेळीच या लेण्यांची डागडुजी व देखभाल करणे गरजेचे आहे. येथे येणार्या पर्यटकांनी लेण्यांवर नावे टाकुन येथील सौदर्याला गालबोट न लावता, येथिल परिसर साफ व संरक्षित कसा राहिल याची दक्षता घेतली पाहीजे. असे आवाहन शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्रने केले आहे.

# संक्षिप्त...

## नागोठण्यात हुतात्मा विरभाई कोतवाल व हिराजी पाटील यांची पुण्यतिथी साजरी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे येथील नाभिक समाज बांधवांच्या वतीने हुतात्मा विरभाई कोतवाल व हुतात्मा हिराजी पाटील यांची ८० वी पुण्यतिथी अत्यंत देशभक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली.

सोमवार दि. २ जानेवारी हा दिवस हुतात्मा विरभाई कोतवाल व हुतात्मा हिराजी पाटील यांचा हुतात्मा दिन म्हणून नाभिक समाज बांधव देशभक्तीमय वातावरणात साजरा करत असतात. हा हुतात्मा दिन साजरा करताना नाभिक समाज बांधवांमध्ये प्रचंड प्रमाणात उत्साह संचारलेला दिसून येत होता. नागोठणे येथील नाभिक समाज बांधव सकाळी ५.४५ वाजता नाभिक समाजाचे आधारस्तंभ भाई टके यांच्या निवासस्थानी एकवटले.

त्यानंतर मशाल पेटवून हुतात्मा विरभाई कोतवाल, हुतात्मा हिराजी पाटील अमर रहे, भारत मातेकी जय अशा घोषणा देत नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणात जमा झाले व सकाळी ६.१० वाजता श्री जोगेश्वरी माता मंदिरा समोरील दीपस्तंभावरील दीप पेटवून सलामी दिली.

नंतर हुतात्मा विरभाई कोतवाल व हिराजी पाटील यांना वंदन केले यावेळी भाई टके, उदंड रावकर, बाळासाहेब टके, महेंद्र माने, रविंद्र टके, दिगंबर खराडे, सुधाकर निंबाळकर, महेंद्र पवार, जगदीश उर्फ पप्या दिवेकर, मिलिंद गुजर, मनोज गायकवाड, दिपक पवार, राजू माने, सत्यजित रावकर, अभिषेक गुजर, महेंद्र जाधव आदींसह नाभिक समाज बांधव उपस्थित होते.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# डॉ.प्रकाश राठोड यांचा पुढाकार : राकेश कोकळे मित्र परिवाराच्या प्रयत्नाने गरजवंतांना ब्लँकेटचे वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

ऐन थंडीच्या दिवसांत गोरगरीब गरजवंतांना मायेची ऊब देण्यासाठी बदलापूर येथील ममता हॉस्पिटल स्त्री रोग तज्ञ डॉ. प्रकाश राठोड यांच्या पुढाकाराने माथेरान मधील राकेश कोकळे मित्र परिवाराच्या प्रयत्नाने शास्त्री हॉल येथे सायंकाळी पाच वाजता कष्टकरी विधवा महिला तसेच अन्य गरजवंतांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.डॉ प्रकाश राठोड हे नेहमीच माथेरान मधील गरजवंतांना सढळ हाताने मदतीसाठी पुढाकार घेत असतात. राकेश कोकळे यांचे जुने हितसंबंध असल्याने कोकळे यांनी इथल्या गरजवंतांसाठी काही सहकार्याची मागणी केल्यास डॉ. राठोड नेहमीच सहकार्याची भूमिका पार पाडत आहेत. मागील कोरोना काळात सुध्दा त्यांनी घोड्यांसाठी पशुखाद्य उपलब्ध करून दिले होते.

यावेळी एकूण सत्तर ब्लँकेटचे वाटप करण्यात आले त्याचा लाभ सर्व गरजवंतांनी घेतला.सर्व लाभार्थ्यांनी डॉ.प्रकाश राठोड आणि राकेश कोकळे मित्र परिवाराचे आभार मानले. या स्तुत्य उपक्रमासाठी राकेश कोकळे मित्र परिवाराचे प्रवीण बावदाने, करण जानकर, पंकज कोकरे, शुभम सपकाळ, अनिकेत कोकरे, तुषार बिरामने, मारुती कोकळे, संतोष ढेबे, आतिश ढेबे, दीपक रांजाणे, जहुर चिपाडे यांची मोलाची साथ लाभली.



# ‘रामबाग’मध्ये संगीतमय कार्यक्रम रंगला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुबईच्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथे उभारण्यात आलेल्या माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर उद्यान अर्थात रामबागमध्ये नवीन वर्षानिमित्त रविवारी (दि. १) लाईव्ह म्युझिकल इव्हेंट या सुरेल गाण्यांची मैफिल असलेल्या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यास श्रोत्यांचा प्रतिसाद लाभला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली निसर्गसौंदर्याचे केंद्रबिंदू बनलेली रामबाग फुलली असून उलवे नोड, नवी मुंबई, पनवेल, उरण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील नागरिकांनी वीकेण्डला आपल्या परिवारासह वेळ घालवण्यासाठी रामबागेला पसंती दिली आहे.

दुबईच्या वाळवंटात मिरॅकल गार्डन फुलले. त्याचप्रमाणे न्हावेखाडी येथील चिखलमय जमिनीवर भव्यदिव्य आणि सर्वांगसुंदर रामबाग फुलली आहे. १४ एकर जागेतील या रामबागेत विविध प्रकारची फुलझाडे, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन असे दोन सेल्फी पाँईंट, मचवा, पाण्याचे कारंजे, अशा सर्व बाबी निसर्गप्रेमींना आकर्षित करतात. सायकांळी विद्युत रोषणाई डोळ्यांचे पारणे फेडते. त्याचबरोबर वाहन पार्किंग, सुरक्षा अशा विविध पायाभूत सुविधा या ठिकाणी असल्याने हजारो नागरिक भेट देऊन मनमुराद आनंद घेत आहेत.

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी या मनमोहक



रामबागमध्ये संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याने रसिकांनी त्याचा मनमुराद आनंद घेतला. त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे यांनी परिवारासह या उद्यानाला भेट दिली. या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, मंदिर कमिटी अध्यक्ष सी. एल. ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते अरुण ठाकूर आदी उपस्थित होते. नववर्षाची सुरुवात नयनरम्य रामबागमध्ये संगीतमय कार्यक्रमाने झाल्याने उपस्थित नागरिकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले.

# विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने उचलण्यात आला मातीचा ढिगारा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे माजी उपमहापौर विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने नवीन पनवेल सेक्टर ३ मधील मातीचा ढिगारा उचलण्यात आला. तत्परतेने हि समस्या सोडवल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत विक्रांत पाटील यांचे आभार मानले. पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग १८ मधील नवीन पनवेल सेक्टर ३ मध्ये स्टील मॅन सोसायटी समोरील असलेल्या उद्यानालगत अनेक दिवस मातीचा ढिगारा पडला होता व याला कचराकुंडीचे स्वरूप येत चालेले होते. याबाबतची तक्रार नागरिकांनी माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्याकडे केली. कर्तव्यदक्ष मा.नगरसेवक विक्रांत पाटील यांनी त्वरित महापालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नागरिकांना त्रासदायक ठरत असलेल्या मातीचा ढिगारा उचलण्यास सांगण्यात आले. त्यानुसार अधिकाऱ्यांनी सकारत्मक प्रतिसाद देत मातीचा ढिगारा उचलून घेतला. विक्रांत पाटील तत्परतेने हि समस्या सोडवल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत त्यांचे आभार मानले.



# ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशिन्सच्या साठवणुकीसाठीच्या गोदामाच्या बांधकामाचे भूमीपूजन संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशिन्सच्या साठवणुकीसाठी आवश्यक असलेल्या गोदामाच्या बांधकामाचे भूमीपूजन मौजे शित–ोळे, ता.पेण येथे आज दि.२ जानेवारी २०२३ रोजी पेण प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या हस्ते भूमीपूजन संपन्न झाले.

यावेळी सार्वजनिक विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे, रोहा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवळ, पेण तहसिलदार श्रीमती स्वप्नाली डोईफोडे, उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, दादर सागरी पोलीस निरीक्षक गोविंदराव पाटील, उद्योजक राजू पिचिका, डी.एम. पाटील, चेतन पाटील, प्रकाश झावरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने मनोगत व्यक्त करताना उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे यांनी ईव्हीएम,व्हीव्हीपॅट मशिन्सच्या साठवणुकीसाठी आवश्यक असलेल्या गोदामाच्या बांधकामाच्या बांधकामास साधारणत: १२ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. हे दुमजली आरसीसी फ्रेम स्ट्रक्चरचे एकूण बांधकाम २ हजार १४८ चौरस सेंटीमीटरचे आहे.

या कामाकरिता ८ कोटी ७१ लाख २४ हजार २४४ इतक्या रकमेस शासनाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे, अशी माहिती दिली.

त्या पुढे म्हणाल्या की, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी अत्यंत विचारपूर्वक व दूरदृष्टीने ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशिन्सच्या साठवणुकीसाठी आवश्यक असलेल्या गोदामाकरिता रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या पेण तालुक्यातील मौजे शितोळे येथील जागेची निवड केली आहे.

हे ठिकाण जिल्ह्यातील सात मतदारसंघांना जोडणारे आहे. यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या ईव्हीएम,व्हीव्हीपॅट मशिन्स सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने हे एक अत्यंत महत्वाचे पाऊल उचलले गेले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन पेण तहसिलदार श्रीमती स्वप्नाली डोईफोडे यांनी केले.

# न्यू इंग्लिश स्कूल मोरामध्ये दोन दिवसीय स्पर्धा व विज्ञान प्रदर्शन

## उरण पंचायत समिती शिक्षण विभाग आणि जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना वाव देण्यासाठी तंत्रज्ञान आणि खेळणी यांची सांगड घालत उरण पंचायत समिती शिक्षण विभाग आणि जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या संयुक्त विद्यमाने उरण तालुक्यात न्यू इंग्लिश स्कूल मोरा येथे दोन दिवस स्पर्धा आणि विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अशा सर्व माध्यमाच्या आणि सर्व व्यवस्थापनाच्या शासनमान्य शाळांचे स्पर्धात्मक कार्यक्रम ३ जानेवारी २०२३ रोजी सकाळी नऊ वाजल्यापासून घेण्यात येतील. ज्यामध्ये कूट प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, विज्ञान परिसंवाद, प्रतिकृती मूल्यांकन अशा स्पर्धा घेण्यात येतील.



४ जानेवारी २०२३ सकाळी १०.०० वाजता एक दिवसीय विज्ञान प्रदर्शन जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल मोरा या शाळेमध्ये आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे उपाध्यक्ष अनंताशेठ मोरू म्हात्रे हे आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी पं. स. उरण संजय भोये हे असणार आहे. या प्रदर्शनात १०० पेक्षा जास्त विविध प्रयोग सादर करण्यात येणार आहे. आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमधील विविध स्पर्धा आणि विज्ञान प्रदर्शन यात क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ४ जानेवारी २०२३ रोजी सायंकाळी ३ वाजता बक्षीस समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या सौ.ममताताई प्रितम म्हात्रे उपस्थित राहणार आहेत.

३ आणि ४ जानेवारी रोजी विविध स्पर्धेत आणि विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना पाहण्यासाठी तसेच त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी सर्व पालक, नागरिक आणि उरणकरांनी न्यू इंग्लिश स्कूल, मोरा येथे भेट द्यावी असे आवाहन पंचायत समिती उरण, शिक्षण विभाग आणि जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

# म्हसळा तालुक्यातील १३ ग्रामपंचायतीमध्ये सरपंचपदाची निवड बिनविरोध ; राष्ट्रवादीची सरशी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात १३ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका दिनांक १८ डिसेंबर २०२२ रोजी पार पडली असून मा.जिल्हाधिकारी रायगड यांचे मंगळवार दि.२७ डिसेंबर २०२२ रोजीचे आधिसूचनेनुसार निवडून व बिनविरोध निवड झालेले सरपंच जाहीर केले आहेत.

१)काळसुरी– राजेंद्र चंद्रकांत घोसाळकर २)फळसप – साळवी सुधीर परशुराम ३)कणघर – सावंत रश्मी संतोष ४)तोराडी – पवार गुलाब अरविंद ५) संदेरी –पास्टे शुभांगी विलास ६) घोणसे –रमेश धोंडू कानसे ७) लेप–शिगवण स्नेहा संजय ८) तोंडसुरे –सुरेश भिकू महाडीक ९ )खरसई– कोमल कमळाकर वेटकोळी १०)देवघर –पोटले सौजन्या सुजित, ११)निगडी– पाखड वेदिकाकल्पेश, १२) कांदळवाडा–बने पांडुरंग महादु १३)रेवळी येथे सरपंच पद राखीव प्रवर्गातील उमेदवार असल्याने सरपंच पद रिक्त असल्याचे जाहीर केले आहेत.

उपसरपंचपदाची निवडणुक मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच निवडणुक नियम१९६४मधील नियम व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधिल कलम ३३ मधील तरतुदीनुसार २ जानेवारी २०२३ रोजी निवडणुक कार्यक्रम जाहीर केले नुसार १)काळसुरी उपसरपंच पदी– वैदही पेरवी २)फळसप उपसरपंच – ३)कणघर – ४)तोराडी उपसरपंच पदी–नसीमा मुकादम ५) संदेरी – ६) घोणसे – शंकर दर्गे ७) लेप– मधुकर लाड ८)तोंडसुरे – प्रीती पवार ९ )खरसई– नजीर जहांगिर १०)देवघर उपसरंचपदी – कृष्णा दिवेकर ११) निगडी उपसरपंच–जयवंत मोरे १२) कांदळवाडा–प्रकाश पाखड १३) रेवली येथे उप सरपंचपदी – देवजी गौऱ्या गाणेकर यांची निवड झाली असुन या ग्राम पंचायतीमध्ये सरपंच पद रिक्त असल्याने प्रभारी सरपंच पदाची जबाबदारी असणार आहे. म्हसळा तालुक्यातील १३ ग्राम पंचायतीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे १० सरपंच पदासाठी निर्वाचित झाले असून उपसरपंच पदी तर दिनांक २ जानेवारी रोजी पार पडलेल्या उपसरपंच पदाचे निवडणुकीत कांदलवाडा ग्राम पंचायत वगळता ११ ग्राम पंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकाऱ्याची उपसरपंचपदी नियुक्ती झाली आहे. नवनियुक्त सरपंच आणि उपसरपंच यांचे खासदार सुनिल तटकरे यांनी मॅसेज व फोन करून अभिनंदन केले आहे.

# दीपक वेलणकर यांची ‘आवाजाची कार्यशाळा’ ला नागरिकांचा प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील ब्राह्मण सभा संस्थेच्या ’साहित्यसाधना’ समूहाच्या वतीने आवाजाची कार्यशाळा घेण्यात आली होती. नवीन पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहामध्या ही कार्यशाळा झाली.

आकाशवाणी, सह्याद्री वाहिनीवर गेली ३५ वर्षे वृत्तनिवेदन करणारे आणि इलेक्ट्रॉनिक वाहिनीवरील पहिले वृत्तनिवेदक आणि ’व्हाईसगुरू’ अशी ख्याती असलेले दीपक वेलणकर यांनी मार्गदर्शन केले. पनवेल, रायगड परिसरातील कलाप्रेमींनी याचा लाभ घेतला.

आजपर्यंत ९५०० हून अधिक नवोदितांना दीपक वेलणकर यांनी आवाजाचे प्रशिक्षण दिला. आपल्या प्रदीर्घ व अनुभवसिद्ध कार्य शैलीतून आवाज कसा ला–वावा, जोपासावा, त्यावर संस्कार कसे करावे याबाबत त्यांनी सोदाहरण मार्गदर्शन केले. तसेच काही अभ्यास व सराव करून घेतला. यावेळी मार्गदर्शन करताना दीपक वेलणकर म्हणाले कि, आवाजाला प्रवाही व दमदार बनवण्यासाठी निरनिराळे व्यायाम करावे लागतात.

व्यासंगाचे वेड पांघरूण घेऊन आवाजाला सुसंस्कृत करावे लागते. यालाच शास्त्रीय भाषेत आवाज साधना शास्त्र (व्हॉईस कल्चर) असे म्हणतात. आजकाल अँकरिंग, जाहिराती, डबिंग व्हॉइसिंग, रेडिओ जॉकी, व्यक्तिमत्त्व विकास अशी क्षेत्रे तरुणांना खुणावत आहेत असे ते म्हणाले.

या कार्यक्रमासाठी शंकर आपटे, पद्मनाभ व मुग्धा भागवत यांनी मोलाचे योगदान दिले.